आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
४ जुलै २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस पदभरती प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे सरकारचे आदेश

- थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्यासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी हीच योग्य जागा असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- त्रिनिनाद इथले भारतीय वंशाचे नागरिक आता ओवरसीज सिटीजन ऑफ इंडिया कार्डसाठी पात्र ठरतील, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घोषणा

**आणि**

- वाशीम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात ४ जण ठार

**<><><><>**

राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा बोगस पदभरती प्रकरणी, संबंधित विभाग आणि शिक्षणसंस्थांच्या अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करायचे आदेश दिले असल्याची माहिती शालेय शिक्षण राज्य मंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहाला दिली. आमदार सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. या प्रकरणी एका महिन्याच्या आत राज्यस्तरीय चौकशी समिती स्थापन केली जाणार असल्याचंही भोयर यांनी सभागृहाला सांगितलं. राज्य सरकारच्या १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार ठरवलेल्या,शाळांच्या संच मान्यतेच्या निकषात सुधारणा केली जाणार आहे, तसंच शालार्थ ओळखपत्र तातडीनं देण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे, असंही त्यांनी एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. शासन निर्णयासंबंधी विरोधी पक्षाच्या सूचना विचारात घेण्याकरता एका बैठकीचं आयोजन करणार असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली. आमदार अभिजीत वंजारी यांनी याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला होता.

**<><><><>**

राज्यातल्या मालमत्ता खरेदी विक्रीच्या नोंदणीनंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या हिश्शाचा एक टक्का रक्कम त्वरित देण्यासाठी वेगळी यंत्रणा तयार केली जाईल अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत एका लक्षवेधीच्या उत्तरात दिली. या विषयावर अर्थमंत्री आणि मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. रणधीर सावरकर यांनी ही लक्षवेधी मांडली होती.

सध्या राज्यातल्या नगरपालिकांचे ९३० कोटी, महानगरपालिकांचे ४ हजार ३२९ कोटी तर जिल्हा परिषदांचे २ हजार ५९८ कोटी इतकी रक्कम देणं बाकी असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली.

धाराशीव जिल्ह्यात पवनचक्की कंपन्या स्थानिक गुंड आणि पोलीस अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याबद्दलच्या सर्व तक्रारींची पोलिस महानिरीक्षकाकडून उच्चस्तरीय चौकशी करायची घोषणा गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी केली. यासंदर्भातील लक्षवेधी कैलास पाटील यांनी उपस्थित केली होती. पवनचक्की कंपन्यांचे दलाल स्थानिक गुंडांच्या मदतानं शेतकऱ्यांना मारहाण करतात, शेतकऱ्यांना धनादेश देऊन कामं करून घेतात, मात्र नंतर हा धनादेश वटत नाही, पण खोटं संमतीपत्र तयार केलं जातं, पोलिसांकडूनही शेतकऱ्यांना त्यांच्याच शेतात मारहाण केली जाते असे मुद्दे पाटील यांनी आपल्या लक्षवेधीतून मांडले. सरकार अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का प्रश्नही पाटील यांनी विचारला. याला पंकज भोयर यांनी उत्तर दिलं. पवनचक्कीप्रकरणी प्राप्त झालेल्या ३१३ तक्रारींपैकी २१० तक्रारी निकाली निघाल्या आहेत, तर १०३ तक्रारींवर कार्यवाही सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. धाराशीव जिल्ह्यातल्या यासंबंधीच्या प्रकरणांबद्दल जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षकांना सूचना दिल्या गेल्या आहेत. या प्रकरणांची पोलीस महानिरीक्षकांमार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करू असं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या त्रिशक्ती प्रवेशद्वारावर थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण केलं. थोरले बाजीराव पेशवे यांच्या स्मारकाची योग्य जागा ही राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी हीच आहे. याच

ठिकाणी तिन्ही सैन्यदलांचे अधिकारी भविष्याचं प्रशिक्षण घेतात. ते बाजीराव यांच्याकडून प्रेरणा घेतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**- होल्ड - अमित शहा बाइट -**

अमित शहा यांच्या हस्ते या पुतळ्याचे शिल्पकार विपुल खटावकर आणि स्थापत्यकार अभिषेक भोईर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ, लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंन्ट जनरल धीरज सेठ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या दौऱ्यात अमित शहा कोंढवा परिसरात जयराज क्रीडा संकुलाचं उद्घाटन आणि बाळासाहेब देवरस रुग्णालयाची पाहणी करणार आहेत तसंच वडाची वाडी रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या पीएचआरसी हेल्थ सिटीचं भूमिपूजनही करणार आहेत.

<><><><>

गेल्या १० वर्षांत सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या माध्यमातून २८ कोटींपेक्षा अधिक रोजगारांच्या संधी निर्माण केल्याची माहिती केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग- मंत्री जितनराम मांझी यांनी आज दिली. मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

महिला आणि युवकांना आत्मनिर्भरतेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री रोजगार गॅरंटी योजना शहरी आणि ग्रामीण भागात राबविली जात आहे. यातून उद्यम पोर्टलवर नोंद केलेल्यांना प्रशिक्षण देऊन सबसिडीतून कर्ज उपलब्ध करून दिले जाते. प्रधानमंत्री रोजगार गॅरंटी योजनेतून ८० टक्के ग्रामीण भागात तर २० टक्के शहरी भागात रोजगार उपलब्ध करून दिल्याची माहिती मांझी यांनी दिली. गेल्या पाच वर्षांत नोंदणीकृत MSME युनिट्सची संख्या १५ पटींनी वाढली आहे. आजमितीला देशात एकूण ६ कोटी ५३ लाख MSME युनिट्स कार्यरत आहेत. तसंच, MSME युनिट्सना दिलेल्या कर्जांची रक्कमही चार पटींनी वाढल्याचं मांझी यांनी सांगितलं.

<><><><>

भारत हा जगभरातला तिसऱ्या क्रमांकाचा स्टार्टअप हब असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्रिनिदाद आणि टोबॅगोतल्या भारतीय समुदायाला संबोधित करताना म्हटलं आहे.

त्रिनिदाद आणि टोबॅगोमधल्या भारतीय समुदायाचा प्रवास धैर्याचा असल्याचं ते म्हणाले. त्रिनिनाद इथले भारतीय वंशाचे नागरिक आता ओवरसीज सिटीजन ऑफ इंडिया कार्ड साठी पात्र ठरतील अशी घोषणाही त्यांनी केली. या कार्डामुळे भारतीय वंशाच्या नागरिकांना भारतात राहण्यास आणि काम करण्यास कोणतीही अडचण येणार नाही असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. कॅरेबियन द्विपसमूहात सर्वप्रथम आर्थिक व्यवहारात यूपीआय प्रणालीचा वापर केल्याबद्दल मोदी यांनी त्रिनिनाद आणि टोबॅगोचं कौतुक केलं.

यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिनाच्या राष्ट्रपती जेवियर मिली यांच्या आमंत्रणावर अर्जेंटिनाला भेट देत आहेत. ५७ वर्षांनंतर भारतीय प्रधानमंत्र्यांची अर्जेंटिनाला ही पहिलीच भेट आहे. या भेटीत दोन्ही देशांमधे सहयोग आणि भागीदारी वाढवण्याच्या उपायांवर चर्चा होईल.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. समाजासाठी स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि दृष्टीकोन आजही मार्गदर्शक असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं म्हटलं आहे. स्वामी विवेकानंदांनी देशाचा इतिहास आणि सांस्कृतिक परंपरेप्रति अभिमान आणि आत्मविश्वासाची भावना जागृत केली. ते सेवा आणि करुणेच्या मार्गावर चालत असल्याचं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले.

<><><><>

वाशीम जिल्ह्यात जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर काल नागपूर कॉरिडॉरवर वाहन चालकाचं नियंत्रण सुटल्यानं झालेल्या अपघातात ४ जण ठार तर १ जण जखमी झाला. या अपघातात तिघंजण जागीच ठार झाले तर एकाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. अपघातग्रस्त वाहन नागपूर जिल्ह्यातल्या उमरेड इथलं आहे.

<><><><>

शाळा- महाविद्यालयांतल्या विद्यार्थी- विद्यार्थिनींना एसटीचे पास थेट त्यांच्या शाळांत दिले जात आहेत. १६ ते ३० जून या कालावधीत सुमारे ५ लाख २१ हजार ३५४ विद्यार्थ्यांनी पास घेतल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. याआधी सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत

बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना दिल्या जाणाऱ्या मोफत एसटी पासचा लाभ आतापर्यंत ३ लाख २१ हजार ३५४ विद्यार्थिनीं घेतला आहे. त्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊन पास दिल्याचंही सरनाईक यांनी सांगितलं. आदिवासी पाडे आणि दुर्गम भागातील शालेय विद्यार्थी एसटीनं शाळेत जात असतात. त्यामुळे या भागांतील एसटीच्या फेऱ्या कोणत्याही परिस्थितीत रद्द करू नका अशा सूचना प्रत्येक आगार प्रमुखांना दिल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

<><><><>

पालघर जिल्ह्याच्या भूमि अभिलेख विभागाच्या उप अधीक्षक कार्यालयातल्या अपील प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी येत्या १२ जुलैला भूमि लोक अदालत आयोजित करण्यात येणार आहे.

जिल्हा अधीक्षक कार्यालयात आयोजित या अदालती मध्ये जमीन मोजणीच्या तसंच फेरफार नोंदणीच्या प्रकारणांसह इतर तक्रारींचा निपटारा केला जाणार आहे.

<><><><>

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या भंडारदरा धरणातून सुमारे दोन हजार घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाणी प्रवरा नदीपात्रात सोडण्यात येत आहे. तर नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून सुमारे १२ हजार घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी पात्रात सोडण्यात येत आहे.

//<><><><>//